# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **नांदेड** |
| 2 | पोलीस स्टेशन | पो.स्टे विमानतळ जि. नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | पो.स्टे विमानतळ गु.र.नं. २२/२०२६ क. 7 A भ्र.प्र.अ. १९८८ |
| 4 | तक्रारदार | पुरुष, वय ४६ वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | साहेबराव नागोराव गुंडीले, वय ५१ वर्षे, व्यवसाय झेरॉक्स दुकान चालक, रा. बजरंग कॉलनी, माता गुजरीजी चौक, नांदेड (खाजगी इसम) |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक २९.०१.२०२६ चे १२.२८ ते १६.५१ वाजताचे दरम्याण |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक ३०.०१.२०२६ चे ०१.१२ वाजता |
| 8 | मागणी केलेली रक्कम | ३०,०००/— रुपये |
| 9 | स्विकारलेली रक्कम | २५,०००/— रुपये |
| 10 | **थोडक्यात माहिती** – दि. २८/०१/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड येथे त्यांचे दोन्ही मुलींचे कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी फाईल दाखल केली होती. नमूद दोन्ही मुलींचे जातीचे वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांनी माझी जात वैधता समिती कार्यालयात ओळख आहे, मी तेथे सांगून तुमचे काम करून टाकतो, एक वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी ३०,०००/— रुपये द्याव लागतील आणि दोन वैधता प्रमाणपत्र काढायचे असतील तर ५०,०००/— रुपये लागतील असे म्हणून लाचेची मागणी केली होती.<br>दि. २९/०१/२०२६ रोजी तक्रारदार यांनी नमूद आरोपी खाजगी इसम यांचे नमस्कार चौक ते मालटेकळी रोडवरील साई झेरॉक्स सेंटर वर भेट घेतली आणि तक्रारदार यांच्या एका मुलीचे जातीचे प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र काढायचे आहे असे सांगितले. तेव्हा आरोपी खाजगी इसम गुंडीले यांनी माझी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड कार्यालयात चांगली ओळख आहे, माझा त्याठिकाणी प्रभाव आहे, मी त्या कार्यालयात सांगून तुमचे जातीचे वैधता प्रमाणपत्र काढून देतो असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयात कोणाला सांगून प्रमाणपत्र काढून देता असे विचारले. तेव्हा खाजगी इसमाने तुम्हाला काय करायचे, मी तुम्हाला वैधता प्रमाणपत्र काढून देतो असे म्हणुन एक वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी शासकीय पंचासमक्ष तडजोडीअंती २५,०००/— रुपये लाचेची मागणी केली.<br>दि. २९/०१/२०२६ रोजी तक्रारदार यांनी आरोपी खाजगी इसम यांचे नमस्कार चौक ते मालटेकळी रोडवरील साई झेरॉक्स सेंटर वर भेट घेतली. तेव्हा आरोपी खाजगी इसम गुंडीले यांनी तक्रारदार यांच्याकडून शासकीय पंचासमक्ष २५,०००/— लाचेची रक्कम स्वतः साठी स्वीकारताना रंगेहाथ मिळून आला आहे. म्हणुन पोस्टे विमाणतळ येथे गुन्हा दाखल करण्यात आला. | |

सदरची सापळा कारवाई मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेड चे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार, पोलीस निरीक्षक सुरेश बनसोडे व नांदेड युनिट पथक यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | |
|---|---|
| **१) संदीप पालवे, पोलीस अधीक्षक** | – ०२४६२ – २५५८११, मो.नं. ९२२६४८४६९९ |
| **२) श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक** | – ०२४६२ – २५५८११ |
| **३) श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक** | – मो.नं. ९३५९०५६८४०. |
| **४) टोल फ्रि** | – १०६४ |
| **५) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी क्रमांक** | – ०२४६२ – २५३५१२ |
| **६) Website** | – **www.acbmaharashtra.gov.in** |
| **७) Mobile App** | – **www.acbmaharashtra.net** |
| **८) Facebook Page** | – **www.facebook.com/maharashtraACB** |
| **९) Twitter** | – **@ACBnanded** |
| **१०) Instagram** | – **acb_nanded** |
| **११) Youtube Cahnnel** | – **@AntiCorruptionBureauNanded** |
| **१२) whats App number** | – ८९५६५०१०६४ |

कार्यालय, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र

**पोलीस उपअधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड**